स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

पीएच्.डी.संशोधनाचा संक्षिप्त आराखडा

संशोधन विषय

“संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ मर्या. : एक प्रशासकिय अभ्यास, विशेष संदर्भ मराठवाडा विभाग”.

: संशोधक :

साबळे बाळु सुर्यभान

भवानी पेठ मुरुड ता.जि.लातूर

: मार्गदर्शक :

प्राचार्य डॉ. अजय पाटील

श्रीमती सुशीलादेवी देशमुख वरिष्ठ महाविद्यालय लातुर.

सन २०१४

विषय प्रवेश :

सामान्यपणे पाच हजार वर्षापुर्वीचा इतिहास लाभलेल्या 'भारत' देशाचे वैशिष्टये म्हणजे हा देश अनेक खेडयांनी बनलेला आहे. तसेच 'भारत' हा कृषी प्रधान देश आहे. भारतातील बहुसंख्य लोक खेडयात राहतात. राष्ट्रपिता महात्मा गांधीनी भारतवासीयांना खेडयाकडे चला असा संदेश दिला आहे. खरा भारत देश खेडयात बसलेला आहे. खेडे हे लोकशाही अवस्थेचे व विकासाचे मुलभुत केंद्र आहे यानुसारच स्वातंत्र्यपुर्व काळातील खेडी ही आर्थिकदृष्टया स्वंयपुर्ण होती. गावातच परस्परांच्या आर्थिक गरजा एकमेंकांच्या सहकार्याने भागविण्याची पध्दत होती. शेतकरी शेती करित पण शेतीला लागणारे अवजारे इतर साधने यासाठी बिगर शेती करणारे लोक उदा. सुतार, लोहार, चांभार इत्यादी मदत करित असत. हे परस्परांच्या गरजा पूर्ण करुन आपला उदरनिर्वाह करित असत. या पध्दतीमुळेच बारा 'बलुतेदारी' पध्दत रुढ झाली असावी. शेती करणारा 'कुणबी' व बिगर शेतीची कामे करणारा 'अडाणी' असे म्हटले जात असे. कुणबी लोकांनी गाव बसविले व इतरांच्या उदरनिर्वाहिची सोय केली.

स्वातंत्र्य पुर्व काळातील बलुतेदारी पध्दत स्वातंत्र्यानंतरच्या काळातही अनेक वर्ष चालू आहे. फरक एवढाच आहे की, पुर्वीच्या अविकसित जातींना विकसित करण्यासाठी वेगवेगळया जाती गटामध्ये विभागणी करण्यात आली आहे. त्यानुसार अनुसूचित जाती (SC), अनुसुचित जमाती (ST), भटक्या विमुक्त जाती (VJNT), इतर मागास्वर्गीय (OBC), विशेष मागासवर्ग (SBC), इत्यादी गटामध्ये जातीची विभागणी करण्यात आली. यातील अनुसुचित जाती गटामध्ये अनेक जातीचा समावेश करण्यात आला आहे. या जाती संपूर्ण भारत भर विखुरलेल्या आहेत.यापैकीच महाराष्ट्रात एकुण एक्कोन्नसाठ (५९) अनु.जाती आहेत. या जातीतील सदस्य संख्या संपुर्ण कमी जास्त प्रमाणात सर्वत्र विखुरलेली आहेत. या जातीचे आस्थित्व ऋग्वेद, व वैदिक काळातही होते. या जाती मागासलेल्या असल्याने या लोकाना शेत जमिनी नव्हत्या त्यामुळे यातील बहुतांश जनता मोठया प्रमाणत शहरी भागात वास्तव्यास गेली आहे.

स्वातंत्र्यपुर्वकाळात अनुसुचित जातीतील हा समाज अस्पृश्य समाज म्हणुन ओळखला जात असे. या अनुसुचित जातीतील प्रत्येक जातीचा व्यवसाय व कामे ठरवून दिलेले असत प्रत्येक जण आपआपली कामे करत असत. त्यामुळे ब्रिटीश काळापासून आजता-गायत हा समाज शैक्षणिक व्यावसायिक, आर्थिक, धार्मिक व राजकीय अविकसितच राहिला यात चर्मकार समाज व त्यातील काही पोट जाती ह्या ग्रामिण भागात वास्तव्य करणा-या जाती आहेत. या परंपरेनुसार कातडी कमावणे व त्यापासुन चांगल्या वस्तु तयार करणे हा यांचा उद्योग आहे. त्यांना स्वतःच्या शेत जमिनी अत्यंत कमी प्रमाणत आहेत ते ही जिरायती स्वरुपाच्या आहेत. या जातीतीत लोकांना व्यवसायासाठी जागा नाहीत. उदरनिर्वाहासाठी जमिनी नसलेला हा समाज आर्थिकदृष्टया मागसलेला आहे. त्यामुळे म्हणव्या त्या प्रमाणत आपल्या मुला - मुलीचे शिक्षण करु शकत नाही. यामुळेच हा समाज आपल्या उदरनिर्वाहासाठी रस्त्याच्या कडेला. बसस्टॅड, शाळा महाविद्यालया शेजारी दवाखाना औद्योगिक वसाहत झाडाखाली बसलेला दिसतो. यामुळेच हा समाज विकासापासून दुर आहे. आजही या चर्मकार समाजाची विकास अवस्था फारशी बदललेली नाही.

- यामुळेच अनुसुचित जातीतील लोकांना न्याय देण्यासाठी व त्यांना विकासाच्या प्रवाहासाठी भारत सरकार व महाराष्ट्र शासन प्रयत्नशील असल्याचे दिसुन येते. यासाठी महाराष्ट्र शासनाने अनेक जातीच्या गटासाठी सामाजिक न्याय व विशेष सहाय विभगाअंतर्गत ई-शिष्यवृत्ती विभाग, डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ मर्यादित, आम आदमी बीमा योजना, महाराष्ट्र राज्य अपंग, वित व विकास महामंडळ, इतर मागासवर्ग विकास महामंडळ, संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ मर्या, वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ मर्यादित. इत्यादी महामंडाळाची स्थापना केल्या आहेत.

यानुसार महाराष्ट्र शासनाने **१९५६** च्या कंपनी कायदयातंर्गत महाराष्ट्र चर्मोद्योग विकास महामंडळाची स्थापना **०१ मे १९७४** रोजी केली असून **दिनांक ०२/०१/२००३** च्या शासन निर्णयानुसार या महामंडळाचे नाव 'संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ' (मर्यादीत) असे करण्यात आले आहे. सदरचे महामंडळ अनुसूचित जातीतील चर्मकार व त्याच्या पोट जाती उदा. चांभार, ढोर, होलार, मोची इत्यादी या जातीचा आर्थिक, शैक्षणिक, व सामाजिक विकास करुन त्यांना दारिद्रय रेषेच्यावर आणण्यासाठी स्थापन झाले आहे. **शासन निर्णय क. चविम १०९५/६४६१/उद्योग - ५ दिनांक २४-०६-१९९६** अन्वये दिलेल्या आदेशानुसार महामंडळचे प्रशासकिय नियंत्रण सामाजिक न्याय विभागाकडे वर्ग करण्यात आले आहे.

सदर महामंडळाची पुढील उद्देशासाठी स्थापना करण्यात आली आहे.

१) राज्यात चर्मोद्योगाचा विकास करणे
२) अनुसूचित जाती मध्ये चर्मोद्योगातील कारागीरांचा विकास करणे
३) चर्मोद्योगातील तंत्रज्ञान विकसित करणे
४) चर्मवस्तुंसाठी बाजारपेठेची निर्मिती
५) राज्यातील चर्मोद्योग विकासासाठी चालना देणे.

इत्यादी उद्देशासाठी या महामंडळाची स्थापना करण्यात आली आहे.या महामंडळाची आर्थिक तरतुद तसेच या महामंडळाची राज्यातील चार उत्पादन केंद्रे आहेत. विक्री केंद्रे, अनेक उत्पादने, बाजारपेठ, तसेच मान्यता प्राप्त संस्थेकडून व्यवसाय करु इच्छीणा-या व्यक्तीसाठी प्रशिक्षणाची सोय करणे व कर्ज देणे ही महामंडळाची विविध कार्य आहेत.

त्यामुळेच महाराष्ट्राच्या खेडयापाडयात विखुरलेल्या चर्मकार समाजाला महामंडाळाच्या विविध योजनांचा लाभ सुलभतेने घेता यावा. यासाठी आता जिल्हा स्तरावर जिल्हा कार्यालयाच्या स्वरुपात यंत्रणा निर्माण करण्यात आल्यामुळे याव्दारे स्वंयरोजगार व चर्मोद्योग करणा-या होतकरु व्यक्तिना कर्ज रुपाने सहाय्य करुन अनेक लघु उद्योगांना मोठया प्रमाणात प्रोत्साहन देण्यात येत आहे. या महामंडळाच्या माध्यमातुन जास्तीत जास्त लोकांना अर्थसहाय्य करुन यशस्वी उद्योजक बनविण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय विभागाचा ध्यास आहे. हे संत रोहीदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळाचे प्रधान कार्यालय मुंबई या ठिकाणी असुन सहा विभागीय कार्यालये ३५ जिल्हा कार्यालयामार्फत चालणा-या या महामंडळाची उत्पादने, उत्पादन केंद्रे, विक्री केंद्रे या सर्व विभाग मार्फत या महामंडळाचे कामकाज चालते.

समस्या सुत्रण :-

सदर संशोधनाचा मुख्य उद्देश संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळांचा प्रशासकीय अभ्यास करणे हा आहे. यामध्ये या महामंडळाचे नेमके कोणत्या प्रकारचे स्वरुप आहे.? याची संघटनात्मक रचना कशा प्रकारची आहे ? सदरील महामंडळ अनुसूचित जातीतील चर्मकार समाजाच्या व्यक्तीच्या विकासासाठी कोणते कार्य करते. त्याच बरोबर या समाजातील व्यक्तीना व्यवसाय रुपी मार्गदर्शन कसे करते. त्याच बरोबर हे महामंडळ आपली भूमिक पार पाडत असताना नेमके कोणत्या समस्याना सामोरे जावे लागते या समस्याचे स्वरुप कसे असते या संदर्भात संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ मर्या. कशा प्रकारच्या उपाययोजना करते? भविष्य काळात हे महामंडळ आपल्या बदलत्या काळानूसार आपल्यात कशाप्रकारचे बदल घडवून आणू शकेल? या सर्व विषयावर अध्ययन करणे हा संशोधनाचा मुख्य उद्देश आहे.

संशोधनाचे उद्देश :

१) संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळाची स्थापना त्याची पार्श्वभुमी तसेच त्याची कार्ये यांचा अभ्यास करणे.

२) हे महामंडळ अनु- जातीतील चर्मकार जातीतील गरजु व्यक्तीनां करित असलेल्या मदत कार्याचा अभ्यास करणे.

३) अनु. जातीतील चर्मकार जातीच्या व्यक्तीबाबत महामंडळाचे भुमिका तपासणे.

४) संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळाची आर्थिक स्थितीच्या अभ्यास करणे.

५) सदरील महामंडळाच्या उत्पादन केंद्राची माहिती घेणे.

६) सदरील महामंडळाच्या विक्रि केंद्राची माहिती घेणे.

ग्रहीतके :-

१) संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळातील अध्यक्ष व सदस्यांना शासनाकडून व्यापक अधिकार व स्वातंत्र्य दिले जाते.

२) संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळाविषयी चर्मकार या समाजातील जनतेत जागरुकता आहे पण महामंडळाकडे योजनासाठी अर्ज करणा-याची संख्या अत्यंत नगण्य आहे.

३) अनुसूचित जातीतील चर्मकार समाजाला समान न्याय मिळवून देण्याबाबत संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळाची भुमिका मानवतेच्या द्रष्टीकोनातुन उपयुक्त आहे.

४) सदरील महामंडळातील योजनेबाबत व कर्ज प्रकरणाबाबत चर्मकार जातीतील जनतेत पूरेशा प्रमाणात माहिती नाही.

५) व्यवसायासाठी मार्गदर्शनपर शिबीरे आयोजित करण्याचे महत्वपूर्ण कार्य महामंडळ पार पाडते.

६) सदरील महामंडळाने तयार केलेले उत्पादने दर्जेदार स्वरुपाचे आहेत.

<u>नमूना निवड</u> :-

मराठवाडा विभागतील संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळाचे आयुक्त यांची मुलाखत घेतली जाईल तसेच काही पदाधीकारी व चर्मकार जातीतील आशा काही गरजू व ज्यांचे पूनर्वसन झालेल्या नागरीकांच्या मुलाखती घेतल्या जातील हि निवड प्रमाणाशिर आधारावरच केली जाईल.

<u>संशोधन पध्दती</u> :-

सामाजिक शास्त्रातील संशोधन पध्दतीप्रमाणेच या संशोधनासंदर्भात वर्णनात्मक व विश्लेषणात्मक संशोधन पध्दतीचा वापर केला जाईल.

<u>तथ्य संकलन</u> :-

संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ मर्या. : एक प्रशासकिय अभ्यास विशेष संदर्भ मराठवाडा विभाग या विषयांतर्गत संशोधन करीत असताना प्राथमिक *व द्वितीय स्त्रोत आशो दोन्हीही प्रकारच्या स्त्रोतांचा अभ्यास घेतला जाणार आहे.*

१) प्राथमिक स्त्रोत :-

संशोधकाडून स्वतःह उपस्थित राहून प्रत्यक्ष आवलोकन (Direct Observation) अनूसूचि,मुलाखती (Interview) व प्रश्नावली इत्यादीच्या माध्यमातून माहिती व आकडेवारी गोळा केली जाणार आहे.

२) द्वितीय स्त्रोत :-

द्वितीय तथ्य संकलनात प्रकाशित दस्तऐवजाचा वापर केला जाईल. त्यात विविध पूस्तके,मासिके,विशेषांक,जी.आर,सार्वजनिक प्रलेख इत्यादीचा वापर केला जाणार आहे

अध्ययन क्षेत्र मर्यादा :-

संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ मर्या. :- एक प्रशासकिय अभ्यास विशेष संदर्भ मराठवाडा विभाग. या दृष्टिकोनातून आज पर्यंत फारसा विचार झालेला नाही. साहजिकच यामूळे संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळाचा अभ्यास करावा लागणार आहे.

या संदर्भात केला जाणारा संशोधनाला काही मर्यादा घालाव्यात या दृष्टिने मराठवाडा विभागातील सात जिल्ह्यांचा अभ्यास करावा लागणार आहे.

प्रकरणाची मांडणी :-

"संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ मर्या. :- एक प्रशासकिय अभ्यास विशेष संदर्भ मराठवाडा विभाग".

या संशोधन अहवालात खालील प्रकरणाचा अभ्यास करण्यात आला आहे.

प्रकरण पहिले :- प्रस्तावना

⇨ विषयाची प्राथमिक माहिती

⇨ राष्ट्रिय स्तरावरील माहिती दिली जाईल.

⇨ संशोधन पध्दती.

प्रकरण दुसरे

⇨ अनुसूचित जातीची सद्यस्थिती व शासनाची भूमिका - कार्यवाही

⇨ शासनाची योजना व त्यांची अंमलबजावणी

प्रकरण तिसरे

⇨ संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळाची रचना, कार्य,अधिकार व भूमिका

प्रकरण चौथे

⇨ संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळाची आर्थीक स्थिती, उत्पादने,विक्री केंद्र,बाजारपेठ व प्रत्यक्ष अमलबजावणी.

प्रकरण पाचवे-क्षेत्र अभ्यास

⇨ संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळातील योजना व त्यांची अमलबजावणी

⇨ आयुक्त व इतर पदाधिका-यांच्या मुलाखती

⇨ प्रत्यक्ष यलाभार्थी नागरीकांच्या मुलाखती

प्रकरण सहावे - निष्कर्ष आणि शिफारशी

या प्रकरणात संशोधनातील अंतीम निषकर्ष नमूद करण्यात येतील. तथ्यांचे संकलन केल्यानंतर यावरुन निषकर्ष काढले जाणार आहेत व त्यावरुन अनुसूचित जातीतील चर्मकार व त्याच्या इतर पोटजातीची सद्यस्थिती व महामंडळाची भूमिका स्पष्ट करण्यासाठी योग्य उपाय सचविले जाणार आहेत.

:- संदर्भसुचि व परिशिष्टे :-

<u>संदर्भसूचि</u>

१) डॉ.बोधनकर,प्राध्यापक,विवेक अलोनी,सामाजिक संशोधन पध्दती, श्री साईनाथ प्रकाशन नागपूर

२) प्रा.डॉ.नाडगोंडे गुरुनाथ द. सामाजिक संशोधन पध्दती फडके प्रकाशन कोल्हापूर

३) भारतीय समाज व्यवस्था डॉ. मीना मंगरुळकर

४) संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळाची माहिती पुस्तिका

५) Maharashtra Government.in

६) Charmakar's in Maharashtra by Dr. B.V. Bhosale

७) Charmakar Samaj Dr. B.V. Bhosale

८) LIDCOM (Leather Industries Development Corporation of Maharashtra)

: मार्गदर्शक :
प्राचार्य डॉ.अजय पाटील
विभाग प्रमुख,लोकप्रशासन विभाग
श्रीमती सुशिलादेवी देशमूख वरिष्ठ महाविद्यालय,
खाडगाव रोड,लातूर.

: संशोधक :
श्री साबळे बाळू सुर्यभान
भवानी पेठ मुरुड ता.जि.लातूर

:- प्रमाणपत्र -:

प्रमाणित करण्यात येते की,श्री साबळे बाळू सूर्यभान हे माझ्याकडे ‘लोकप्रशासन’ या विषयामध्ये “संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ मर्या. एक प्रशासकिय अभ्यास, विशेष संदर्भ मराठवाडा विभाग” या विषयाकरीता पीएच्.डी.चे विद्यार्थी म्हणून विद्यापीठाच्या आर. ए.सी.नुसार देण्यात आले आहेत.त्यानुसार पुढील संशोधनासाठी हे माझ्या मार्गदर्शनाखाली पूर्णवेळ काम करतील.

सबब प्रमाणपत्र देण्यात येत आहे.

मार्गदर्शक

प्राचार्य डॉ.अजय पाटील

श्रीमती सुशीलादेवी वरिष्ठ महाविद्यालय,

खाडगाव रोड,लातूर.

सोबत-

विद्यापीठाचे आर.एस.सी.पत्र